# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.७८२०/२१/अ.क्र.५८५७/२४/०१**

**श्री. एस. एन. शहा**

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी एफ/दक्षिण विभाग**

बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
२ रा मजला, डॉ.बी.ए.रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग**

बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
२ रा मजला, डॉ.बी.ए.रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित/अनुपस्थित. (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.११.२०२४) रोजी प्राप्त झाली आहे. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०३.२०२१ | - | १७.०५.२०२१ | - |

अपिलकर्तांनी दि.१३.०७.२०२१ रोजी आयोगाकडे "प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाही" असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ३०.०३.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे तीन मुद्यांबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

1. "Full Set up of Attornment File of Sewree Nursing Home along with all his properties which was Attornment Completed by MCGM. Full details No. official permission of Ground + 1st Floor which include Shabbir Trading Accepted.
2. Ibrahim Dost Mahhmmed Khan and Yusuf Khan Became Building Tenant of Shed 9.
3. I Want Known Why I am not became tenant of BMC of shed No. 11, I have official permission of Ground + 1st floor then why I deprived to become tenant of BMC and without membership LY Annexure LY issue."

जन माहिती अधिकारींनी उत्तर न दिल्याने प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग यांनी दि. १७.०५.२०२१ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेण्यात आली नसून आदेश पारित केले नाही.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. १३.०७.२०२१ रोजी "प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसून आदेश पारित केले नाही" असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी एफ/दक्षिण विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकरी एफ/दक्षिण विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी एफ/दक्षिण विभाग यांचे उत्तर न प्राप्त झाल्यामुळे प्रथम अपील अर्ज दाखल केला असून प्रथम अपील आदेश अभिलेखात उपलब्ध नाही.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग यांनी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेण्यात आली नसून आदेश पारित केले नाही.

अपीलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात अपीलीय कारणमध्ये "प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाही" असे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी एफ/दक्षिण विभाग यांनी त्यांचे निवेदन दिनांक १८.११.२०२४ रोजी आयोगास सादर केले की, दि. १९.११.२०२४ रोजी सार्वजनिक विधानसभा निवडणूक कामकाजाकरिता या कार्यालयातील संपूर्ण कर्मचारी / अधिकारी वर्ग निवडणूक कर्तव्यार्थ असून सदर दिवशी अपील सुनावणीस हजर राहू शकणार नाही. यास्तव विनंती करण्यात येते की, सदर द्वितीय अपील सुनावणी पुर्ननियोजित करावी.

तसेच त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळण्याबाबत विनंती केली असून त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणो पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Maharashtra

मुंबई
दिनांक :१९.११.२०२४

19-11-2024
( डॉ.प्रदीप व्यास )
राज्य मुख्य माहिती आयुक्त